॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com


✻ सुविचार ✻
स्वतःची चूक स्वतःला कळली की बरेच अनर्थ टळतात.





■ अहमदनगर ■ गुरुवार, दि. २५ एप्रिल २०२४ ■ वर्ष ५ वे ■ अंक ५५ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145




मतदार जनजागृतीसाठी स्वीप मास्टर पुरस्कार

पान क्र. २ वर



केंद्र व राज्य सरकार शेतकऱ्यांच्या खंबीरपणे पाठीशी

पान क्र. ३ वर



मोदी गॅरंटीवर देशातील जनतेचा विश्वास

पान क्र. ४ वर

## SPOT NEWS

### नितीन गडकरींना भाषणादरम्यान भोवळ

● **यवतमाळ ।** केंद्रीयमंत्री आणि नागपूरचे उमेदवार नितीन गडकरींना यवतमाळच्या सभेमध्ये भाषण करताना भोवळ आल्याची घटना घडली. भाषण करताना अचानक त्यांना भोवळ आल्याने त्यांना अक्षरशः उचलून नेण्यात आले. नितीन गडकरींना याआधीही अनेकदा भोवळ आल्याची घटना घडली आहे. गडकरींना याआधी रक्तातील साखर कमी पडल्याने भोवळ आल्याची घटना घडली होती. तर उष्माघातानेही भोवळ येण्याची शक्यता असते. दरम्यान, नितीन गडकरींना याआधीही अनेकवेळा जाहीर सभेवेळी भोवळ आल्याचे प्रकार घडले आहेत.

### ४७ लाख लंपास केल्याप्रकरणी शिक्षण विभागाकडून गुन्हा

● **मुंबई ।** बनावट चेक, सह्यांचा वापर करून शिक्षण विभागाचे ४७ लाख रुपये लंपास केल्याप्रकरणी मरीन ड्राईव्ह पोलिस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करीत असल्याचा खुलासा शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने केला आहे. बँकेचे व्यवहार सी.टी.एस. प्रणालीद्वारे होतात. त्यामुळे या बनावट धनादेशाची तपासणी संबंधित बँकांच्या अधिकारी/कर्मचारी यांनी योग्य प्रकारे केली नसल्याचे दिसून येते. त्यामुळे याबाबतची जबाबदारी संबंधित बँकांची आहे. या १० बनावट धनादेशाद्वारे काढण्यात आलेली रक्कम ४७ लाख ६० हजार रुपये (रु. ४७,६०,०००/-) आरबीआयच्या मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने बँक ऑफ महाराष्ट्र, मंत्रालय शाखेने, राज्य क्रीडा विकास निधीच्या बचत खात्यामध्ये दि.२४ एप्रिल २०२४ रोजी जमा करुन भरपाई केली आहे. राज्यातील दर्जेदार खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्पर्धा पूर्व प्रशिक्षण / परदेशी क्रीडा साहित्य आयात करणे / आंतरराष्ट्रीय स्पर्धेला जाण्यासाठी खेळाडूंना आर्थिक सहाय्य करणे इ, करिता अर्थसहाय्य राज्य क्रीडा विकास निधीतून करण्यात येते. त्यासाठी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे राज्य क्रीडा विकास निधीचे बचत खाते बँक ऑफ महाराष्ट्र, मंत्रालय, मुंबई या शाखेत कार्यरत आहे.

# शिखर बँक प्रकरणात अजित पवार यांना क्लीन चिट

## पोलिसांकडून क्लोजर रिपोर्ट सादर । कोणतेही पुरावे आढळले नसल्याचे स्पष्टीकरण

● **मुंबई । वीरभूमी –**

राज्यातील बहुचर्चित शिखर बँक घोटाळ्या प्रकरणी उपमुख्यमंत्री अजित पवार, सुनेत्रा पवार आणि इतर आरोपींना मुंबई पोलिस आर्थिक गुन्हे शाखेने (इओडब्ल्यू) दिलासा दिला आहे. या घोटाळ्या प्रकरणी कोणतेच पुरावे नसल्याचे पोलिसांनी म्हटले आहे. त्यामुळे या प्रकरणातील सर्व दोषींना दिलासा मिळाला आहे. ऐन लोकसभा निवडणुकीच्या धामधुमीत अजित पवार यांच्यासह सुनेत्रा पवार यांना देखील या प्रकरणी दिलासा मिळाला आहे.

पोलिसांनी या प्रकरणी जानेवारी महिन्यात क्लोजर रिपोर्ट सादर केला होता. बँकेच्या कर्ज वाटप आणि साखर कारखाने विक्रीत अनियमितता असल्याचे आरोप अजित पवार आणि इतर आरोपींवर करण्यात आले होते. क्लोजर रिपोर्ट सादर करतांना कर्ज वाटप व साखर कारखाने विक्री संबंधी बँकेला नुकसान झाल्याचे कोणतेच पुरावे नसल्याचे आर्थिक गुन्हे शाखेने म्हटले आहे. त्यामुळे अजित पवार यांना दिलासा मिळाला आहे.

शिखर बँक घोटाळा प्रकरणात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह अन्य मोठ्या नेत्यांना दिलासा मिळाला आहे. तब्बल २५ हजार कोटी रुपयांचा हा घोटाळा होता. या पूर्वी या प्रकरणात मुंबई पोलिसांनी जानेवारी महिन्यात दुसऱ्यांदा क्लोजर रिपोर्ट सादर केला होता. या पूर्वी महावीकास आघाडी सरकारच्या काळात पहिला क्लोजर रीपोर्ट सादर झाला होता. तपासात पुरावे आढळले नसल्याने हा रीपोर्ट कोर्टात सादर करण्यात आला होता.



गुरु कमोडिटीकडून जरंडेश्वर साखर कारखान्यानं जंरडेश्वर सहकारी साखर कारखाना चालवयला घेतला होता. मात्र, या व्यवहारात त्या आर्थिक गुन्हे शाखेला कोणत्याही गैरप्रकार आढळला नाही. ईडीने या प्रकरणात ठपका ठेवला होता. गुरु कमोडिटी व जरंडेश्वर साखर कारखान्यांनी सगळ्या गोष्टी केवळ कागदावर दाखवल्या होत्या, असा उल्लेख ईडीने केलेल्या आरोप पत्रात करण्यात आला होता. आर्थिक गुन्हे शाखेनं आमदार रोहित पवार यांच्याशी संबंधित कंपन्यांनादेखील क्लीन चिट दिली आहे. 'रोहित पवारांच्या बारामती ॲग्रोनं कन्नड साखर कारखाना खरेदी केला, तेव्हा बारामती ॲग्रोची आर्थिक स्थिती चांगली असल्याने पैशांची हेराफेरी करण्यात आली नाही, असं आर्थिक गुन्हे शाखेनं क्लोजर रिपोर्टमध्ये म्हटले आहे.

शिखर बँकेच्या कामकाजाची नाबार्डने २००७ ते २०११ दरम्यान तपासणी केली होती. या तपासणीत बँकेने उपलब्ध केलेल्या अहवालात अनियमितता आढळल्याने जानेवारी २०१३ मध्ये बँकेच्या कामकाजाची चौकशी सुरू करण्यात आली होती. दरम्यान, या प्रकरणी २०१४ मध्ये सहकार आयुक्तांना हा चौकशी अहवाल सादर केला. यात बँकेचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाल्याचे निष्पन्न झाले होते. मात्र, पोलिस तपासात या बाबतचे कोणतेही पुरावे आढळले नसल्याने बँकेचे नुकसान झाले नसल्याचे पोलिसांनी म्हटले आहे. दरम्यान, जानेवारी २०२४ मध्ये दाखल झालेला हा क्लोजर रिपोर्ट विशेष कोर्टानं स्वीकारलेला नाही.

### शिखर बँक घोटाळा?

■ शिखर बँक घोटाळा तब्बल २५ कोटी रुपयांचा आहे. शिखर बँकेने राज्यातील २३ सहकारी साखर कारखान्यांना १५ वर्षांपूर्वी कर्ज दिले होते. मात्र, हे कारखाने तोट्यात जाऊन बुडाले. दरम्यान, हे कारखाने काही नेत्यांनी खरेदी केले. यानंतर पुन्हा या कारखान्यांना शिखर बँकेने कर्ज दिले गेले. यावेळी अजित पवार या बँकेच्या संचालक मंडळात होते. अजित पवार यांच्यासोबतच अमरसिंह पंडित, माणिकराव कोकाटे, शेखर निकम या नेत्यांचा या प्रकरणात समावेश होता.

# कोकण पदवीधर निवडणूक काँग्रेस लढविणार : पटोले

● **मुंबई । वीरभूमी –**

येत्या जून – महिन्यात अपेक्षित असलेली विधान परिषदेच्या कोकण पदवीधर मतदारसंघाची निवडणूक लढविण्याची घोषणा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी आज केली. सहा वर्षांपूर्वी कोकण पदवीधर मतदारसंघाची निवडणूक आता महाविकास आघाडीचे घटकपक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने लढवली होती. आता या निवडणुकीत काँग्रेसने उमेदवार देण्याचे जाहीर केल्याने मविआत संघर्ष होण्याची चिन्हे आहेत.

विधान परिषदेत कोकण पदवीधर मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करणारे भाजपचे निरंजन डावखरे यांची मुदत ७ जुलै २०२४ रोजी संपत आहे. त्यामुळे या जागेसाठी जून महिन्यात निवडणूक अपेक्षित आहे. आता महाविकास आघाडीत काँग्रेसने कोकण पदवीधर मतदारसंघावर दावा केला आहे.

नाना पटोले म्हणाले की, कोकण पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत महाविकास आघाडीचा उमेदवार म्हणून काँग्रेस पक्षाचा उमेदवार उभा करावा, यावर सर्व बाजूंनी विचार करण्यात आला. कोकण विभागातून काँग्रेस पक्षाचा उमेदवार द्यावा, अशी आग्रही मागणी पदाधिकाऱ्यांनी केली.

# उत्कर्षा रुपवते, प्राजक्त तनपुरे यांचे अर्ज दाखल

## नगर दक्षिणमधून ७, तर शिर्डीतून ९ जणांचे अर्ज । आज शेवटचा दिवस

● **नगर । वीरभूमी –**

लोकसभेच्या शिर्डी लोकसभा मतदार संघातून वंचित बहुजन आघाडीच्यावतीने उत्कर्षा रुपवते यांच्यासह ९ जणांनी तर नगर दक्षिणमधून आ. प्राजक्त तनपुरे यांच्यासह ७ जणांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. आज गुरुवार दि. २५ रोजी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस आहे. नगर दक्षिणमधून आ. प्राजक्त तनपुरे यांनी अर्ज दाखल केल्याने नवा ट्विस्ट निर्माण झाला असून शरद पवार काही धक्कातंत्र वापरतात का? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

याशिवाय मदन कानिफनाथ सोनवणे यांनी राईट टू रिकॉल पार्टीतर्फे, रवींद्र लीलाचंद कोठारी यांनी अपक्ष, अमोल विलास पाचुंदकर यांनी अपक्ष, महेंद्र दादासाहेब शिंदे यांनी वंचित बहुजन आघाडीतर्फे व अपक्ष म्हणून नगर



दक्षिमधून अर्ज दाखल केले. तसेच मच्छिंद्र राधाकिसन गावडे व छगन भिकाजी पानसरे यांनी अपक्ष म्हणून अर्ज दाखल केले आहेत.

शिर्डी मतदारसंघातून वंचित बहुजन आघाडीच्या वतीने उत्कर्षा रुपवते यांनी निवडणूक निर्णय अधिकारी बाळासाहेब कोळेकर यांच्याकडे उमेदवारी अर्ज दाखल केला. याशिवाय या मतदारसंघातून जनहित लोकशाही पार्टीच्या वतीने अशोक रामचंद्र आल्हाट यांनी, बहुजन समाज पार्टीच्या वतीने रामचंद्र नामदेव जाधव व राजू शिवराम खरात या दोघांनी अर्ज दाखल केले. तसेच अशोक अनाजी वाकचौरे, ॲड. सिद्धार्थ दीपक बोधक, सतीश भिवा पवार, संजय पोपट भालेराव व गोरक्ष तान्हाजी बागूल यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

# ईव्हीएम पडताळणीवरील निर्णय राखीव

## सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाकडे देशाचे लक्ष । व्हीव्हीपॅट पावत्याची मोजणीबाबत आदेश होण्याची शक्यता

● **नवी दिल्ली । वीरभूमी –**

एकीकडे लोकसभा निवडणुकीचा प्रचार रंगात आलेला असताना सुप्रीम कोर्टामध्ये ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅटच्या वापराबाबत सुनावणी सुरू आहे. आज कोर्टाने निवडणूक आयोगाला पाच महत्त्वाचे प्रश्न विचारून त्याचे उत्तर मागितले आहे. दुपारी दोन वाजेपर्यंत हे उत्तर देण्यासाठी वेळ देण्यात आला आहे. त्यामुळे पुढील काही तासांत कोर्टात ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅटचा वापर आणि व्हीव्हीपॅटमधील पावत्यांच्या मोजणीबाबत कोर्टाकडून महत्त्वाचे आदेश दिले जाण्याची शक्यता आहे.

ईव्हीएममधील प्रत्यक्ष मतदान आणि व्हीव्हीपॅटमधील पावत्यांच्या मोजणी करण्याबाबतच्या याचिका सुप्रीम कोर्टात दाखल करण्यात आल्या आहेत. त्यावर कोर्टासमोर एकत्रितपणे सुनावणी सुरू आहे. आज कोर्टाने आयोगाकडे पाच प्रश्नांची उत्तरे मागितली आहेत. कोर्टाने उपस्थित केलेल्या प्रश्नांमध्ये मायक्रो कंट्रोलर हे उपकरण कंट्रोल युनिटमध्ये असते



की, व्हीव्हीपॅटमध्ये, मायक्रो कंट्रोलरमध्ये एकदाच सर्व माहिती सेट केली जाते की, त्यामध्ये पुन्हा बदल करता येतो, सिम्बॉल लोडिंग युनिट किती आहेत, या प्रश्नांचा समावेश आहे. तसेच मशिनमधील माहिती ३० की ४५ दिवस जतन केले जाते आणि ईव्हीएमच्या तिन्ही युनिट एकत्रित सील केल्या जातात की कंट्रोल युनिट आणि व्हीव्हीपॅट वेगळे ठेवले जाते, असेही प्रश्न कोर्टाने उपस्थित केले आहेत.

दरम्यान, सुप्रीम कोर्टाने या याचिकांवर १८ एप्रिल रोजीच सुनावणी पूर्ण झाली आहे. मात्र, आज कोर्टाकडून आणकी काही मुद्द्यांवर आयोगाकडून खुलासा मागवण्यात आला आहे. याचिकाकर्त्यांनी मतमोजणी करताना व्हीव्हीपॅटमधील सर्व पावत्या मोजण्याची मागणी केली आहे. त्या अनुषंगाने आयोगाने सादर केलेल्या माहितीतील काही मुद्द्यांवरून कोर्टाने आणखी माहिती मागवली आहे. सुनावणीदरम्यान आयोगाने ईव्हीएममध्ये कोणतीही छेडछाड करता येत नाही, असा दावा केला आहे.

आयोगाकडे १७ लाख व्हीव्हीपॅट मशिन आहेत. चाचणीदरम्यान उमेदवार कोणत्याही मशिनची पडताळणी करू शकतात. तसेच व्हीव्हीपॅटमधील सर्व पावत्यांची मोजणी करायचे असल्यास खूप दिवस लागतील, असेही आयोगाने सुनावणीदरम्यान स्पष्ट केले आहे. त्यामुळे सुप्रीम कोर्ट काय निकाल देणार, याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

# दगडाखाली दबल्याने मजूर ठार

## लखमापुरी येथील घटना । विहिरीवर करत होते काम

● **शेवगाव । वीरभूमी –**

विहिरीचे काम सुरू असताना पावसाच्या बचावासाठी दगडाच्या आडोशाला बसलेल्या मजुराचा दगड कोसळल्याने जागीच मृत्यू झाला. शेवगाव तालुक्यातील लखमापुरी येथे ही घटना घडली.

लखमापुरी येथील भारत भगवान गावंडे यांच्या विहिरीवर काम करण्यासाठी बोधेगांव येथील संदीप लहू खंडागळे, राहुल भिमा कांबळे, सुभाष उत्तम वैरागळ आणी प्रविण रमेश खरात हे चार तरुण गेले होते. आज काम करीत असतांना दुपारी साडेचार ते पाचचे दरम्यान वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस सुरु झाला. यापासून बचाव करण्यासाठी यातील तीन तरुण झाडाखाली गेले. विहीरीच्या बाजुला दगड आणि डबराच्या ढिगाऱ्याच्या आडोशाला संदीप लहू खंडागळे (वय ३०) बसले होते. वारा जोरात असल्याने ढिगाऱ्यावरील दगड, माती खंडागळे यांच्या अंगावर पडली. त्याखाली ते गाडले गेल्याने ते ठार झाले.

घटनेची माहिती मिळताच बोधेगांव पोलीस दुरक्षेत्राचे सहाय्यक नानासाहेब फौजदार गर्जे स्वयंसेवकासह तेथे गेले. स्थानिकांच्या मदतीने खंडागळे याचा मृतदेह जेसीबीच्या सहाय्याने बाहेर काढला. शेवगांवचे तहसिलदार प्रशांत सागडे, पोलीस निरिक्षक दिगांबर भदाणे यांनी घटनास्थळी भेट दिली. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी शेवगावच्या ग्रामीण रुग्णालयात पाठवला आहे.

# SPOT NEWS

## अकोले तहसील कार्यालयात निवडणूक परवानगीसाठी कक्ष कार्यान्वित

**● अकोले । वीरभूमी –** शिर्डी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक जाहीर झाली असून शिर्डी लोकसभा मतदारसंघासाठी दिनांक १३/०५/२०२४ मतदान होणार आहे. या निवडणूक विषयक परवानगीसाठी सुविधा कक्ष नवीन तहसील कार्यालयात कार्यान्वित झाला असल्याचे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी रामदास जगताप यांनी दिली. लोकसभा निवडणूकीच्या अनुषंगाने नविन तहसिल इमारतीत परवानगी कक्ष कार्यान्वित (स्थलांतरित) करण्यात आलेला असून उमदवारांनी मोबाईल मधील सुविधा ॲपचा वापर करून निवडणूक विषयक परवानगी व वाहन परवाना घेण्यासाठी वापरावा असे आवाहन देखील सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांनी केले. नागरीकांनी अचारसंहीतेचे पालन करावे. यासाठी पंचायत समिती कार्यालय अकोले येथील इमारतीत निवडणूक विषयक आचारसंहिता अंमलबजावणी कार्यान्वित करण्यात आलेला आहे. शिर्डी लोकसभा निवडणुकीसाठी परवानगी कक्ष व मेडिया सेल नविन इमारतीतील पहिल्या मजल्यावर निवडणूक नायब तहसीलदार दत्तात्रय वाघ यांचे नियंत्रणाखाली कार्यान्वित आहे अशी माहिती सहायक निवडणूक निर्णय अधिकारी रामदास जगताप यांनी दिली.

## पोलीस असल्याची बतावणी करून सहा लाखांची सोन्याची चैन पळविली!

**● नगर । वीरभूमी –** पोलीस असल्याची बतावणी करून सहा लाखांची सोन्याची चैन दोघांनी पळविल्याचे समोर आले आहे. आचारसंहिता काळात गळ्यात सोन्याची चैन घालण्यास बंदी असतानाही तुम्ही का घातली, अशी विचारणा करत ही चोरी करत पोबारा केला आहे. केडगाव उपनगरात मंगळवारी (दि. २३) सकाळी साडेदहाच्या सुमारास ही चोरीची घटना घडली. दरम्यान, पोलिसांनी सीसीटिव्ही फुटेज तपासणी केली आहे. संबंधित लवकरच गजाआड होतील, अशी शक्यता वर्तविली जात आहे. व्यावसायिक बाबूराव नारायण काकडे (वय ६८ रा. राजेंद्रनगर, केडगाव) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात दोघांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. काकडे हे दुचाकीवरून केडगावातील त्यांच्या सुजित ट्रेडर्स दुकानात जात असताना केडगाव वेशी जवळ दुचाकीवरून आलेल्या दोन अनोळखी व्यक्तीने त्यांना थांबण्यास सांगितले. काकडे रस्त्याच्या कडेला थांबले असता ते दोघे म्हणाले, 'आम्ही पोलीस असून आचारसंहिता चालू असताना तुम्ही सोन्याची चैन कशी घातली. आम्हाला तुमच्यावर संशय आहे, तुम्ही तुमच्या गाडीच्या डिक्कीतून गांजा घेऊन जात आहे, तुम्ही गाडीची डिक्की उघडून दाखवा व तुम्ही घातलेली सोन्याची चैन गाडीच्या डिक्कीत ठेवा'. काकडे यांनी त्यांच्यावर विश्वास ठेऊन गळ्यातील १३ तोळ्याची सोन्याची चैन डिक्कीत ठेवली. त्या दोन व्यक्तीने त्यांच्या हाताने डिक्की बंद करून ते दुचाकीवरून नगरच्या दिशेने गेले. काकडे देखील त्यांच्या दुकानाकडे जाण्यासाठी निघाले असता त्यांना संशय आल्याने त्यांनी थांबून डिक्की तपासली असता, त्यात सोन्याची चैन दिसून आली नाही. आपली फसवणूक झाल्याचे काकडे यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी कोतवाली पोलीस ठाणे गाठून फिर्याद दिली आहे.

## अवकाळी पावसाने कौडगाव परिसराला झोडपले; कांदा, फळ पिकांचे नुकसान

**● नगर । वीरभूमी –** बुधवारी दुपारी नगर तालुक्यातील कौडगाव, जांब परिसरात अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. अचानक आलेल्या पावसाने कांदा उत्पादक, वीट भट्टी चालकांसह शेतात काम करणाऱ्यांची एकच धांदल उडाली. दुपारी झालेल्या पावसाने ठिकठिकाणी पाणी साचले होते. तर कांदा, चारा पिकांसह फळपिकांचे मोठे नुकसान झाले.

# मतदार जनजागृतीसाठी स्वीप मास्टर पुरस्कार

### संस्था, शाळा-महाविद्यालये यांना प्रस्ताव पाठवण्याचे आवाहन

**● नगर । वीरभूमी –** जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी सिद्धाराम सालीमठ अहमदनगर यांच्या निर्देशानुसार अहमदनगर व शिर्डी लोकसभा मतदारसंघातील लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत मतदारांनी १०० % मतदानाची भूमिका बजवावी त्याचबरोबर मतदानाची टक्केवारी वाढण्यासाठी व मतदारांमध्ये जनजागृती होण्यासाठी स्वीप नोडल अधिकारी तथा शिक्षणाधिकारी अशोक कडूस यांच्या संकल्पनेतून अहमदनगर जिल्हा स्वीप समितीच्या वतीने स्वीप मास्टर पुरस्काराचे आयोजन करण्यात आले असून व्यक्ती, संस्था, विविध कार्यालये, शाळा/महाविद्यालये यांना प्रस्ताव पाठवण्यासाठी आवाहन स्वीप समितीच्या माध्यमातून करण्यात आले आहे.

सक्षम मतदार, दिव्यांग मतदार, वंचित महिला घटक मतदार, तृतीयपंथी मतदार, ईव्हीएम व्हीव्हीपॅट विषयक जनजागृती, ८५+ मतदार जनजागृती, २०१९ मध्ये कमी मतदानाची टक्केवारी असलेल्या क्षेत्रातील केलेल्या मतदार जनजागृतीच्या उपाययोजना, पोस्टल बॅलेट मतदान, टपाली मतदान, विना मोबदला मतदान, शंभर टक्के मतदान, नवमतदार युवक-युवतींचा सहभाग या विविध विषयांवर स्वीप उपक्रम अपेक्षित आहेत. विविध प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन (निबंध, चित्रकला, रांगोळी, पथनाट्य, मतदार जनजागृती गीत निर्मिती, मेहंदी, पोस्टर, घोषवाक्य, व्हिडिओ/रील बनवा आदी स्पर्धा) रॅलीचे आयोजन, मतदान करण्याची शपथ घेणे, सार्वजनिक ठिकाणी सभा संमेलने आदी ठिकाणी मतदान जनजागृती करणे, स्वतः च्या सोशल मीडियाचा वापर मतदार जनजागृतीसाठी करणे यासंबंधी संकल्पना अपेक्षित आहेत.सर्व उपक्रमांमध्ये आदर्श आचारसंहितेचे पालन करणे आवश्यक आहे.

सहभागी होणाऱ्या घटकांनी आपला प्रस्ताव कामाचा तपशील, छायाचित्रे, वृत्तपत्र कात्रणे, प्रमाणपत्रे, प्रशस्तीपत्रे आदींच्या एका झेरॉक्स प्रतीमध्ये स्वतःचे/संस्थेचे/ कार्यालयाचे/ शाळा महाविद्यालयाचे संपूर्ण नाव, पत्ता, मोबाईल नंबरसह १० मे २०२४ पर्यंत जिल्हा परिषद, माध्यमिक शिक्षण विभाग, जुन्या बसस्थानकासमोर माळीवाडा, मु.पो.ता.ज़ि. अहमदनगर - ४१४००१ या ठिकाणी समक्ष /पोस्टाने/कुरिअरद्वारे जमा करावयाचे आहे. अधिक माहितीसाठी डॉ.अमोल बागुल (जिल्हा मतदारदूत) यांच्याशी ९५९५५४५५५५ या क्रमांकावर संपर्क साधावा.




स्वीप या शब्दाचा अर्थ Systematic Voter's Education and Electoral Participation म्हणजेच निवडणूक-मतदान प्रक्रियेत मतदारांचे पद्धतशीर शिक्षण आणि निवडणूक सहभाग असा अर्थ होतो. जास्तीत जास्त व्यक्ती संस्था व कार्यालये यांनी स्वीप मास्टर पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठवावेत असे आवाहन राहुल पाटील (उपजिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी), मीना शिवगुंडे (स्वीप नोडल अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी), आकाश दरेकर (स्वीप नोडल अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी), प्रदीप पाटील (तहसीलदार-निवडणूक), बाळासाहेब बुगे (उपशिक्षणाधिकारी), प्रशांत गोसावी (निवडणूक नायब तहसीलदार) व सर्व स्वीप समिती सदस्य आदींनी केले आहे.

## अमृतवाहिनी इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये नॅशनल कंपन्यांचे टेक्निकल फेस्ट



**● संगमनेर । वीरभूमी –** विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास व त्यांच्या संशोधन वृत्तीला प्रोत्साहन देण्यासाठी अमृतवाहिनी इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये विविध उपक्रमांचे आयोजन होत असून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील कंपन्यांच्या सहकार्याने झालेल्या तीन दिवसीय टेक फेस्ट मध्ये ४८० स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.

अमृतवाहिनी इंजिनिअरिंग कॉलेजमधील ऑटोमेशन अँड रोबोटिक्स विभागाच्या वतीने एक्स कॅलिबर २०२४ हा एक टेक्निकल फेस्ट राबविण्यात आला. यावेळी उद्घाटन प्रसंगी संस्थेच्या विश्वस्त सौ शरयूताई देशमुख, नाशिकच्या जनरल मॅनेजर सुब्रता मोंडल, श्रीकांत पाटील, डेप्युटी जनरल मॅनेजर प्रशांत देशमुख, एक्स कॅलिबर कंपनीचे प्रमोद वाघ, ओंकार सावळेकर, सॅमसंगचे अजिंक्य जाधव, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, प्राचार्य डॉ. एम ए वेंकटेश विभाग प्रमुख डॉ विलास शिंदे आदीं उपस्थित होते.

ऑटोमेशन अँड रोबोटिक्स विभागाच्या वतीने झालेल्या या टेक्निकल फेस्टमध्ये ४८० स्पर्धक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला असून यामधून रोबोवर, ड्रोन रेसिंग, पेपर प्रेझेंटेशन, लाईन फॉलोवर, रोबो प्रोग्रामिंग, लेथ वार, डिजिटल पोस्टर, प्रेसेंटेशन प्रोजेक्ट, प्रदर्शन आणि ई स्पोर्ट्स या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच या फेस्टमध्ये रुसहास इंजिनिअरिंग, सॅनसून इंडस्ट्री, फलकोन ऑटोमोशन, बेदारे इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड, ग्लोबल सॉफ्ट, प्रोफिलिक नंदिनी इंजीनियरिंग यांनी सहभाग घेतला होता.

## गुणवत्ता सिद्ध महाविद्यालयच स्पर्धेत टिकतील : डॉ. केशव तुपे

**● अकोले । वीरभूमी –** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- २०२० मध्ये आंतरवासिता (इंटरशिप) समाविष्ट करण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांमधील कौशल्यात वाढ होईल, परिणामतः विद्यार्थ्यांना रोजगार प्राप्त करणे शक्य होईल. यापुढे शिक्षकांनी अध्यापना बरोबरच विद्यार्थ्यांना रोजगार संधीच्या वाटा दाखविण्याचे कार्य करून स्पर्धाशील बनवावे. त्यामुळे विद्यार्थी महाविद्यालयाकडे आकर्षित होतील तसेच यापुढील काळात गुणवत्ता सिद्ध करणारे महाविद्यालयच स्पर्धेत टिकतील, असे प्रतिपादन उच्च शिक्षण विभाग पुणेचे सहसंचालक डॉ. केशव तुपे यांनी केले.

राजूर येथील ॲड. एम. एन. देशमुख महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुंबई येथील नायर हॉस्पिटलचे माजी अधिष्ठाता डॉ. रमेश भारमल हे उपस्थित होते.

डॉ. केशव तुपे म्हणाले की, देशात सध्या ढोबळ विद्यार्थी नोंदणी (जी.इ.आर) प्रमाण केवळ



१८.५ टक्के आहे ते ३५ टक्केपर्यंत वाढविण्याचे उद्दिष्ट नवीन राष्ट्रीय धोरणात आहे. जागतिक स्तरावर हे प्रमाण ५२ ते ५३ टक्के इतके वाढलेले आहे. एन.इ.पी. मध्ये विद्यार्थ्यांना बदलून घ्यावे लागेल. त्यामुळे शिक्षकांनी देखील या धोरणाकडे सकारात्मक दृष्टीने पहिल्यास विद्यार्थ्यांमधील शैक्षणिक गुणवत्ता वाढू शकेल. हे या धोरणाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत प्राचार्य प्रोफेसर डॉ. भाऊसाहेब देशमुख यांनी केले. महाविद्यालयाच्या वतीने प्रमुख मान्यवरांचा, आय. क्यू. एस. सी चे समन्वयक व सदस्य, पेटंट प्राप्त शिक्षक, सेवापूर्ती झालेले कर्मचारी तसेच गुणवंत विद्यार्थी इ. चा. यथोचित सत्कार करण्यात आला. वार्षिक अहवालाचे वाचन विद्यार्थी परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. वाल्मिक गीते यांनी केले. डॉ. भरत शेणकर यांनी शैक्षणिक व अभ्यासेतर उपक्रम अहवाल, व प्राध्यापक व्ही.बी. एलमामे यांनी सांस्कृतिक अहवाल इ. चे वाचन केले. या कार्यक्रम प्रसंगी प्रमुख मान्यवरांच्या हस्ते सर्व नैपुण्य प्राप्त विद्यार्थ्यांना बक्षिसे अदा करण्यात आली. याप्रसंगी व्यासपीठावर सत्यनिकेतन संस्थेचे संचालक प्रकाश टाकळकर, नंदकिशोर बेल्हेकर, विजय पवार, रामजी काठे उपस्थित होते. तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. सातपुते व प्रा. व्ही. बी. येलमामे यांनी केले. तर आभार प्रदर्शन डॉ. करंडे यांनी मानले.

# आदर्श लोकप्रतिनिधी, खासदार आपण दिल्लीला पाठवायचा आहे

### माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले यांच्याकडून डॉ. सुजय विखे पाटील यांचे कौतुक । राहुरी तालुक्यात मतदारांच्या गाठीभेटी

**● नगर । वीरभूमी –** मागील पाच वर्षात लोकसभा मतदार संघाता चेहरा मोहरा बदण्याचा प्रयत्न खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी केला. केंद्र सरकारच्या विविध योजनांचा लाभ सामान्य मानसापर्यंत पोहचविण्यासाठी केलेले यशस्वी प्रयत्न खुप महत्वपुर्ण ठरल्याचे गौरवोद्गार माजी मंत्र तथा जिल्हा बँकेचे चेअरमन शिवाजीराव कर्डीले यांनी काढले.

महायुतीचे उमेदवार खा. डॉ. सुजय विखे पाटील यांनी आपल्या निवडणुक प्रचारार्थ बाबळे वाडी, वरशिंदे, ताहाराबाद, गाढकवाडी, म्हैसगाव, कोळेवाडी, शेरीचिखलठाण, दरडगावथडी या गावांमध्ये मतदारांच्या गाठीभेटी घेतल्या. निवडणुकीतील आपली भूमिका स्पष्ट केली. केंद्र सरकारने मागील १० वर्षात घेतलेल्या निर्णयांची माहिती देऊन, यावेळेस पुन्हा नरेंद्र मादी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांना विजयी करण्याचे आवाहन महायुतीच्या नेत्यांनी केले आहे.

लोकसभेचे खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी गेल्या पाच वर्षांत केलेल्या विकासकामांच्या जोरावर नगरकरांच्या मनात आपली प्रतिमा निर्माण केली आहे. त्यांना जिल्ह्याच्या प्रश्नांची जाण आहे. जिल्ह्यातील तरुणांच्या रोजगारासाठी नगर तालूका तसेच श्रीगोंदा येथे औद्योगिक वसाहत निर्माण करण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी यशस्वी प्रयत्न केले आहेत. यामुळे येणाऱ्या उद्योगांमुळे रोजगाराच्या मोठ्या संधी निर्माण होतील असा विश्वास माजी मंत्री कर्डिले यांनी व्यक्त केला.

अहिल्यानगर मतदारसंघांतील जनतेने खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांना पाठबळ देण्याचा निर्णय घेतला आहे. डॉ. विखे पाटील यांच्या विजयामुळे पुन्हा एकदा नरेंद्र मोदी यांचा पंतप्रधान होण्याचा मार्ग अधिक बळकट होईल असा विश्वास व्यक्त करून या विभागाच्या विकासासाठी पुन्हा एकदा महायुतीला आवाहन माजी मंत्री कर्डिले यांनी केले.

### लोकांनी ठरवावे, भविष्यात कसा विकास हवा आहे : सुजय विखे

देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वाखाली काम करताना गेल्या ५ वर्षात मोठ्या प्रमाणात विकासकामे केली. या ५ वर्षात लोकांनी दाखवलेला विश्वास सार्थ ठरवण्याचा प्रयत्न केला आणि गेल्या ५ वर्षांचे प्रगतीपुस्तक आज जनतेसमोर ठेवण्याचे काम करतोय, असे यावेळी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी सांगितले. तसेच आता लोकांनी ठरवायचे आहे की, भविष्यात आणखी कशा पद्धतीने विकास हवा आहे, असे आवाहन केले.

यावेळी उपस्थित नागरिकांसमोर गेल्या ५ वर्षात लोकसभेत केलेल्या कामांचे जनतेसमोर सादरीकरण करत कामांची



सखोल माहितीही डॉ. विखे यांनी दिली. जिल्ह्यात सर्वाधिक विकास कामे महायुतीच्या काळात झाल्याचे त्यांनी सांगितले. त्याच बरोबर पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्याला सर्वाधिक निधी मिळाल्याचा उल्लेख त्यांनी केला. येणाऱ्या काळात जिल्ह्यातील तरूणांना कामासाठी बाहेर जावे लागणार नाही यासाठी आपले विशेष प्रयत्न असतील. त्यासाठी तीन एमआयडीसीची कामे तयार असून लवकरत त्या सुरू केल्या जातील. त्याचबरोबर शेतकऱ्यांसाठी बीयाण्यापासून बाजारपेठेपर्यंत सेवा सुविधा निर्माण करण्यासा मानस त्यांनी यावेळी बोलून दाखविला. पंतप्रधान मोदींच्या हमीच्या जोरावर जिल्हा सुजलाम् सुफलाम् करणार, असे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले.

# SPOT NEWS

## टीसीएस लंडन मॅरेथॉनमध्ये प्राची पवार हिने फडकविला तिरंगा

**नगर । वीरभूमी –**

जगभर प्रतिष्ठेची समजली जाणारी टीसीएस लंडन मॅरेथॉन वयाच्या ४६ व्या वर्षी पूर्ण करुन अहमदनगर जिल्ह्यातील प्राची संग्राम पवार हिने ब्रिटनच्या भुमीवर तिरंगा फडकविला. नुकत्याच टीसीएस लंडन मॅरेथॉनमध्ये यावर्षी प्राची पवार भारताचे प्रतिनिधीत्व करत सहभागी झाल्या होत्या. त्यांनी ४ तास ५८ मिनिटात तब्बल ४२.१९७ कि.मी. अंतर धावून शर्यत पूर्ण करणाऱ्या त्या नगरमधील पहिल्या महिला ठरल्या आहेत. त्यांना एस.पी.जे. स्पोर्टस् क्लबचे संदिप जोशी यांचे मार्गदर्शन लाभले आहे. एक उद्योजिका, आई व गृहिणी अशा वेगवेगळ्या भुमिका निभवत असणाऱ्या ४६ वर्षीय प्राची पवार यांची ही नेत्रदीपक कामगिरी, सर्वच नगरकरांसाठी नक्कीच प्रेरणादायी ठरणार आहे. यापुर्वीही प्राची संग्राम पवार यांनी २०२३ मध्ये गोवा आयर्न मॅन ७०.३ ही स्पर्धा पूर्ण केली आहे. यामध्ये अहमदनगर मधील त्या पहिल्या महिला होत्या. त्याचबरोबर २०२३ मध्ये टाटा मुंबई मॅरेथॉन तसेच २०२४ सालची स्पर्धा ही त्यांनी पूर्ण केलेली आहे. विशेष म्हणजे अहमदनगरचा भुईकोट किल्ला ते गुजरात स्टॅच्यू ऑफ युनिटी असे ५५० किलोमीटर अंतर त्यांनी तीन दिवसात सायकलवर पूर्ण केले आहे. असे नवनवीन रेकॉर्ड त्यांच्या नावावर आहे. टीसीएस लंडन मॅरेथॉनमध्ये प्राची पवार यांनी मिळविलेल्या यशाबद्दल त्यांचे विविध स्तरातून अभिनंदन व कौतुक होत आहे.

## निमगाव वाघात हनुमान जन्मोत्सव सोहळा

**शेवगाव । वीरभूमी –**

निमगाव वाघा (ता. नगर) गावात हनुमान जन्मोत्सव सोहळा मंगळवारी (दि.२३ एप्रिल) विविध धार्मिक कार्यक्रमांनी भक्तीमय वातावरणात पार पडला. हनुमान मंदिरामध्ये पहाटे विधिवत पूजा व आरती करण्यात आली. तर रात्री भजनाच्या भक्तीरसात भाविक तल्लीन झाले होते. गावातील भजनी मंडळाने रामभक्त हनुमानजींवर विविध भजन सादर केले. पहाटे मंदिरात अभिषेक करुन आरती करण्यात आली. यावेळी दिवसभर भाविकांनी हनुमानजींच्या मंदिरात दर्शनासाठी गर्दी केली होती. भाविकांना यावेळी प्रसादाचे वाटप करण्यात आले. तसेच मंदिरास आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. या धार्मिक कार्यक्रमास डोंगरे संस्थेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे, पिंटू जाधव, भरत बोडखे, तुकाराम फलके, सचिन कापसे, सुरेश जाधव, भाऊसाहेब कापसे, बाबा खळदकर, संदीप डोंगरे, अनिल डोंगरे, पोपट भगत, अजय ठाणगे, गोरख गायकवाड, छगन भगत, दत्तू फलके, विठ्ठल फलके, तुकाराम खळदकर, चंद्रकांत जाधव आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. भाविकांना मंदिरात प्रसादाचे वाटप करण्यात आले.

# केंद्र व राज्य सरकार शेतकऱ्यांच्या खंबीरपणे पाठीशी

### मंत्री राधाकृष्ण विखे पाटील । श्रीगोंदा, पारनेर तालुक्यातील शेतकऱ्यांशी साधला संवाद

**नगर । वीरभूमी –**

अडचणीत सापडलेल्या दूध उत्पादक शेतकऱ्यांना पाच रुपये अनुदान देण्याचा महत्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतला होता. निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी झाल्यामुळे जिल्ह्यातील ६७ हजार ५४८ शेतकऱ्यांना ६१ कोटी रुपयांचे अनुदान होवू शकले. केंद्र आणि राज्य सरकार हे शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

मंत्री विखे पाटील यांनी श्रीगोंदा, पारनेर या तालुक्यांमध्ये शेतकऱ्यांशी संवाद साधला. विविध ठिकाणी झालेल्या बैठकांमधून त्यांनी केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांची माहिती दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सर्वसामान्य माणसांच्या हिताचे निर्णय होत आहेत. देश आज विविध क्षेत्रात प्रगती करीत असून, देश महाशक्ती बनण्याच्या दिशेने वाटचाल करीत असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची भूमिका नेहमीच घेतली. एक रुपयात पीक विमा योजनाचे लाभ तालुक्यातील शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात मिळाला. अडचणीत सापडलेल्या दूध उत्पादक शेतकऱ्यांना मदत म्हणून राज्य सरकारने पाच रुपये अनुदानाची योजना सुरु केली. आज जिल्ह्यातील बहुसंख्य शेतकऱ्यांच्या खात्यात अनुदान वर्ग झाले असून, सर्व शेतकऱ्यांना या अनुदान योजनेचा लाभ मिळेल.





जिल्ह्यातील तरुणांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी अनेक उद्योजक आता जिल्ह्यात येण्यास इच्छुक असून, नामवंत कंपन्या येणार असल्यामुळे तरुणांनाही संधी मिळेल. यापुर्वी धाक दडपशाहीमुळे चांगले उद्योग जिल्ह्यातून निघुन गेले. ही परिस्थिती आपल्याला बदलायची असेल तर, उद्योजकांच्या पाठीशी उभा राहणारा खासदार निवडून द्यावा लागेल. देशात पुन्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वामध्ये सरकार येणार असल्यामुळे जिल्ह्याच्या विकासाला चांगले पाठबळ मिळेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## दलित पँथरचे कार्यकर्ते डॉ. सुजय विखे यांच्या प्रचारात सक्रीय

**नगर । वीरभूमी –**

महायुतीचे उमेदवार डॉ. सुजय विखे पाटील यांना महाराष्ट्रातील दलित पँथर संघटनेने जाहिर पाठिंबा दिल्याचे पत्र दलित पँथरचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सुखदेव सोनवणे यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांना दिले. त्याच बरोबर डॉ. सुजय विखे पाटील यांच्या प्रचारासाठी नगर जिल्ह्यातील सर्व कार्यकर्ते सक्रीय झाले असल्याचे सोनवणे यांनी सांगितले.

महायुतीचे उमेदवार खासदार डॉ. सुजय विखे पाटील हे अहिल्यानगरच्या दक्षिण मतदार संघातून लोकसभा निवडणुकीसाठी रिंगणात आहेत. त्यांना विविध पक्ष संघटनांचा पाठिंबा मिळत आहे. त्याता दलित पँथरने पाठिंबा जाहिर केल्याने त्यांचे निवडणुकीतील बळ वाढले असून त्यांचा विजयाचा मार्ग अधिक सुखकर झाला आहे.

पद्मश्री नामदेव ढसाळ यांनी दलित पँथरच्या रुपाने राज्यात आंबेडकरी विचारांची चळवळ उभी केली. यामुळे फुले शाहू आणि आंबेडकर यांचे विचार पुढे घेवून जाणाऱ्या महायुती सरकार नक्की प्रयत्न करेल असा आमचा विश्वास आहे. यामुळे महाराष्ट्रात महायुतीच्या उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने निवडून आणण्यासाठी दलित पँथर सर्वोतपरी प्रयत्न केले जाणार आहेत. असे दलित पँथरचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सुखदेव सोनवणे यांनी सांगितले.

दलित पँथरच्या या भुमिकेमुळे महायुतीच्या उमेदवारांना त्याचा मोठा फायदा होईल, अशा विश्वास सुद्धा सोनवणे यांनी यावेळी व्यक्त केला.

## पालक आणि विद्यार्थ्यांतील संवाद काळाची गरज

### प्रा. आदिनाथ वावरे । काकडे शिक्षणशास्त्र महाविद्यालयात पालक मेळावा

**शेवगाव । वीरभूमी –**

पालक आणि विद्यार्थ्यांमधील संवाद हे केवळ माहितीची देवाणघेवाण नाही तर त्यातून बंधन आणि विश्वास निर्माण होतो. या संवादाच्या माध्यमातून पालक आपल्या मुलांच्या भावना समजू शकतात आणि त्यांना मार्गदर्शन करू शकतात. पालकांनी आपल्या रोजच्या व्यस्ततेमधून वेळ काढून मुलांशी संवाद साधण्यासाठी प्राधान्य द्यावे. असे प्रतिपादन आदिनाथ वावरे यांनी केले.



शहरातील आबासाहेब काकडे शिक्षणशास्त्र महाविद्यालयात मंगळवार दि. २३ रोजी पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मार्गदर्शन करतांना प्रा. बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रा. सुधीर खिल्लारे हे होते.

यावेळी पालक प्रतिनिधी सखाराम घावटे, राजाभाऊ गर्जे, शब्बीर पठाण, संतोष निजवे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी सखाराम घावटे म्हणाले, पालक आणि शिक्षक यांच्यातील समन्वय किती महत्त्वाचा आहे यावर प्रकाश टाकला. श्री. पठाण यांनी मुलींना मुलांप्रमाणेच समान वागणूक देण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात प्राचार्य प्रा. सुधीर खिल्लारे यांनी पालकांच्या जबाबदाऱ्यांवर आणि शिक्षणातील त्यांच्या सहभागावर भाषण केले.

प्रास्ताविक प्रा. भगवान बारस्कर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. स्मिता नाईक यांनी केले. तर प्रा. राम नेव्हल यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या समाप्ती नंतर सर्वांना चहापान आणि अल्पोपहार देण्यात आला. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# पाथर्डी बाजारात बैलांचा भाव घसरला

### चारा, पाणी टंचाईमुळे मोठ्या जनावरांची मागणी घटली । पाथर्डी तालुक्यातील परिस्थिती

**पाथर्डी । वीरभूमी –**

चारा टंचाई, पाणी टंचाई व मोठ्या जनावरांना मागणी नसल्याने कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात भरणाऱ्या जनावरांच्या बाजारात विक्रेत्यांची संख्या वाढल्याने भाव पातळी घसरली. पुढील महिन्यात शेतीची कामे झाल्यावर भाव आणखी कोसळतील, अशी माहिती व्यापाऱ्यांकडून मिळाली. जळगाव, छत्रपती संभाजीनगर, नाशिक जिल्ह्यातील व्यापारी बुधवारी बैल खरेदीसाठी येथील बाजारात आले.



गेले दोन वर्षांपासून तालुक्यात समाधानकारक पाऊस नाही. शेती कामासाठी, ऊस तोडणी हंगामासाठी लागणाऱ्या बैलांच्या प्रतवारीत फरक असल्याने तोडणी हंगामावरून परत आलेल्या तोडणी मजुरांच्या बैलांना तेवढ्या ताकतीचे काम नाही. शेती कामाला साधारण जनावरे सुद्धा चालतात. बुधवारी पाथर्डीचा बैल बाजार असतो. येथील जनावरांचा प्रमुख बाजार असल्याने जिल्ह्यासह शेजारील जिल्ह्यातून व्यापारी येतात. चाळीसगाव, गंगापूर, लासुर स्टेशन, लासलगाव, अंबड, छत्रपती संभाजीनगर, पैठण आदी भागातून व्यापारी उपस्थित होते. मागील महिन्यात ८० हजार रुपयांना विकल्या गेलेल्या बैल जोडीची किंमत आजच्या बाजारात ६० हजारापर्यंत घसरली. बेलापुरी बैलांना मागणीच नाही. तोडणी हंगामासाठी कामगारांबरोबर ऊस वाहतुकीसाठी जी बैलजोडी वापरली जाते तिला बेलापुरी बैल जोडी म्हणतात. आज तालुक्यात पाण्याची एक कावड किमान २० रुपयांना मिळते. एका वेळेला किमान दोन डबे पाणी एक बैल पितो. दिवसातून दोन वेळा उन्हाळ्याच्या दिवसात जनावरांना पाणी पाजावे लागते. चाऱ्यासाठीचा ऊस सध्या चार हजार रुपये टन, मक्याची एक पेंढी चाळीस रुपयांना तर घासाच्या एका जुडीचा भाव दहा रुपये आहे. कडबा पंधराशे रुपये शेकडा, वैरण अडीच हजार रुपये पर्यंत असून अन्नधान्य व जनावरांच्या चाऱ्याचे भाव जवळजवळ सारखेच होत चालले आहेत. एक शेळी दिवसाला किमान ५० रुपयांचा चारा खाते. असे रामनाथ खटके या शेतकऱ्याने सांगितले.

व्यापारी बबन गर्जे म्हणाले, एका जोडीची किंमत ४० हजारांपासून सव्वा लाख रुपये पर्यंत आहे. आवक जास्त व ग्राहक कमी झाल्याने बाजार भाव खाली आले आहेत. जनावरे वाहतुकीचा खर्च वाढल्याने सुद्धा किंमतीत घट होते. एक बैलजोडी दारापुढे बांधून पोसणे म्हणजे किमान चारशे ते पाचशे रुपये रोज खर्चावे लागतात. शेतात मशागतीची कामे संपल्यावर बाजार भाव आणखी खाली येतील. जनावरांवर पोटच्या लेकराप्रमाणे प्रेम करणाऱ्या शेतकऱ्यांची इच्छा नसताना विकण्याशिवाय पर्याय नाही. चारा पाणी नसल्याने जनावरे विकण्या शिवाय पर्याय नसल्याचे आष्टी तालुक्यातील शेतकरी अर्जुन दहिफळे यांनी सांगितले.

तालुक्यात यापूर्वी झालेल्या पशु जनगणने बद्दल माहिती देताना तालुका पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. जगदीश पालवे म्हणाले, तालुक्यात पाणीटंचाईची तीव्रता आहे पण चारा टंचाई अजून फारशी नाही. छावण्याबाबत वरिष्ठांचे अद्याप आदेश नाहीत. दर पाच वर्षांनी पशु गणना होते. गाय वर्ग जनावरे लहान सोळा हजार पाचशे, मोठी ६५ हजार ५१९ असून म्हैस वर्गीय लहान ५० हजार ९२३ तर मोठी २० हजार ६३२ आहे. शेळी एक लाख २५ हजार १३, मेंढी १६ हजार ७०६ अशी जनावरे आहेत. त्यांचे परिस्थितीवर पशुधन विभाग लक्ष ठेवून आहे.

दुभत्या जनावरांचे प्रमुख व्यापारी रमण लाहोटी म्हणाले, दुधाला दर नाहीत, दुधाच्या उत्पन्नावर जनावरे सांभाळणे तोट्याचे झाले आहे. भाकड जनावरांना सांभाळण्यासाठी शेतकऱ्यांकडे पैसा नाही. त्यामुळे त्यांना बाजारात आणले जाते. दुभती जनावरे सध्या विक्रीसाठी लवकर मिळत नाहीत. त्यांना मागणी आहे. त्यांच्या किमतीमध्ये फारशी घसरण झालेली नाही. येथील जनावरे कमी किमतीत घेऊन पाणी असलेल्या पश्चिम व उत्तर महाराष्ट्र भागात विक्रीसाठी व्यापारी नेतात. खरेदीदार विक्रेते वाहतूकदारांमुळे मंगळवार बुधवार परिसरातील आर्थिक उलाढाल वाढते. साखर कारखाने बंद झाल्याने वाढे विक्रीचा व्यवसाय जवळ जवळ आटोपत आला असून आता उसाची विक्री वाढल्याने अशीच परिस्थिती राहिली तर यंदा कारखान्यांपुढे ऊस टंचाईचे सुद्धा संकट वाढणार आहे.

## जागतिक पुस्तक दिनानिमित्त शिक्षकांचा वाचनाचा आगळा वेगळा उपक्रम

**नगर । वीरभूमी –**

शिक्षक वाचत नाहीत, ही तक्रार अनेकदा केली जाते. पण याबाबत केवळ तक्रार न करता सीताराम सारडा विद्यालयाने वाचनाविषयी वेगळा उपक्रम राबवला. केवळ १० महिन्यात शिक्षकांनी २० ते २५ पुस्तके वाचली आहेत. त्याचप्रमाणे शिक्षकांनी पुस्तक खरेदी करण्यासाठी पुस्तक भिशी हा अनोखा उपक्रम राबवला आहे. शिक्षकांची वाचनसंस्कृती वाढवण्यासाठी केलेले हे प्रयत्न इतर शाळांना नक्कीच प्रेरणादायक व अनुकरणीय आहेत, असे प्रतिपादन मुख्याध्यापक हेरंब कुलकर्णी यांनी केले.

हिंद सेवा मंडळाच्या सीताराम सारडा विद्यालयात जुलै महिन्यात मुख्याध्यापक हेरंब कुलकर्णी यांनी शिक्षणावर आधारित असलेली अनेक प्रेरणादायक पुस्तके शाळेसाठी खरेदी केली व ती पुस्तके शिक्षकांना देवून रोज किमान २० पाने वाचावीत असे आवाहन केले. रोज शिक्षक हजेरी पत्रकावर सही करताना मुख्याध्यापकांनी काल किती पाने वाचली याचा आढावा घेवून त्याच्या नोंदी ठेवल्या. एक पुस्तक वाचल्यावर शिक्षकांनी एका स्वतंत्र वहीत प्रत्येक पुस्तकाचा परिचय लिहिला. आज सर्व शिक्षकांची २० ते २५ पुस्तके वाचून झाली आहेत व त्याचे पुस्तक परिचय ही लिहून झाले आहेत. शिक्षकांनी वाचलेल्या पुस्तकात जास्तीत जास्त शैक्षणिक पुस्तके आहेत. तोत्तोचान, नीलची शाळा, माझी काटे मुंढरीची शाळा, दिवास्वप्न, प्रिय बाई, न पेटलेले दिवे, आमचा काय गुन्हा, विनोबा, लीलाताई पाटील यांची पुस्तके यांचा समावेश आहे.

सुरुवातीला रोज वाचनाची सवय होईपर्यंत थोडा कंटाळा वाटला पण आता वाचन हा सवयीचा भाग आहे असे शिक्षक सांगतात. सुटीच्या दिवशी तर काही शिक्षकांनी १०० पाने ही वाचली आहेत. या वाचनाचा परिणाम शिक्षकांच्या दैनंदिन अध्यापनावर ही होतो आहे. खरे शिक्षण कशाला म्हणतात हे यानिमित्ताने समजले आहे. या पुस्तकातून विविध उपक्रम करण्याची प्रेरणा मिळाली असेही शिक्षकांनी सांगितले. त्याचप्रमाणे शिक्षकांना पुस्तक खरेदीची सवय लावावी म्हणून शाळेत पुस्तक भिशी सुरू करण्यात आली आहे. दर महिन्याला शिक्षक पैसे काढतात आणि त्यातून तीन क्रमांक काढून त्या तिघांना प्रत्येकी ३५०० रुपये दिले जातात. ते शिक्षक दुकानात जाऊन शिक्षण विषयक पुस्तके खरेदी करतात आणि सर्वांना आणून दाखवतात व वाचनप्रेमी पाहुणा निमंत्रित करून त्याच्या हस्ते ती पुस्तके दिली जातात.

वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर–४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# मोदी गॅरंटीवर देशातील जनतेचा विश्वास

## खा. डॉ. सुजय विखे पाटील | सोनगाव येथे कॉर्नर मिटींग

**● राहुरी | वीरभूमी –**

देशात सध्या मोदीजींची गॅरंटी सुरू असून देशातील जनतेचा त्यावर विश्वास आहे. ध्येय, धोरण आणि संकल्पांची सांगड म्हणजे पंतप्रधान नरेंद्र असे प्रतिपादन डॉ. सुजय विखे पाटील यांनी केले.

राहुरी तालुक्यातील सोनगाव चौकातील कॉर्नर मिटींगमध्ये ते बोलत होते. यावेळी जिल्हा बँकेचे चेअरमन शिवाजीराव कर्डिले यांच्यासह स्थानिक कार्यकर्ते उपस्थित होते.



डॉ. सुजय विखे पाटील यांनी विरोधकांचा सडकून समाचार घेत विरोधकांकडे नेता म्हणून कोणताही चेहरा नाही. त्यांच्याकडे 'एक ना धड बारा भानगडी आहेत'. ते फक्त देशाला फक्त खड्ड्यातच घालू शकतात. यामुळे पंतप्रधान नरेंद्र हे देशाला एकमेव पर्याय आहेत असे डॉ. सुजय विखे पाटील म्हणाले.

डॉ. सुजय विखे यांनी सांगितले की, सदरची निवडणूक ही देशाची प्रतिनिधित्व ठरवणारी निवडणूक आहे. येणाऱ्या काळात देश कुणाच्या हाती द्यायचा आहे हे जनतेला ठरवायचे आहे. देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या इतके प्रभावी नेतृत्व नाही आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाने मागील १० वर्षात जी प्रगती केली हे जगासमोर मोठे उदाहरण आहे. देशात संविधान मजबूत करण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. लोकशाही अधिक सुदृढ आणि लोखाभिमुख करण्यासाठी देशाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची देशाला गरज आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे देशाला विकासासाच्या माध्यमातून जगात महासत्ता म्हणून पुढे आणायचे आहे. २०४७ च्या विकसित भारताची पायाभरणी करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करा आणि महायुतीच्या उमेदवाराला मोठ्या मताधिक्याने निवडून द्या, असे त्यांनी आवाहन केले.

# ऑनलाईन आयपीएल सट्टा, पोलिसांनी एकाला पकडले

**● नगर | वीरभूमी –**

शहरात आयपीएल सामन्यांवर ऑनलाईन सट्टा लावण्यात येत आहे. त्यात अनेक तरुण फसल्याने त्यांचे कुटुंब अडचणीत आहेत. कोतवाली पोलिस ठाण्याच्या पथकाने आयपीएलवर सट्टा खेळणाऱ्या एकाला काल पकडले. त्याच्याविरुद्ध कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. महेश मनोहर दुडगू (वय ३२, रा. चितळे रस्ता, तोफखाना, नगर) असे त्याचे नाव आहे.

त्याच्याविरुद्ध कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी, शहरातील आशा टॉकीजसमोर एक जण आयपीएल सामन्यावर ऑनलाईन सट्टा लावत आहेत, अशी माहिती पोलिस निरीक्षक प्रताप दराडे यांना मिळाली. त्यानुसार कोतवाली पोलिस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाचे सहायक पोलिस निरीक्षक योगीता कोकाटे, पोलिस अंमलदार शाहीद शेख, इनामदार, दीपक रोहकले, तानाजी पवार, सुजय हिवाळे यांनी रविवारी (दि. २१) रात्री साडेआठच्या सुमारास सापळा लावला.

आयपीएल सामना सुरू असताना दोन ते तीन व्यक्ती गोलाकार बसून त्यांच्याकडील मोबाईलवर बोलताना दिसले. सदर ठिकाणी क्रिकेट बेटिंग जुगार सुरू असल्याची खात्री झाल्यानंतर पोलिसांनी छापा घातला. त्यातील दोघे जण पळून गेले तर महेश दुडगू याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून रोकड, मोबाईल जप्त करण्यात आला आहे.

# आ. आशुतोष काळेंच्या विकासावर अकरा गावातील कोल्हे गटाचे कार्यकर्ते प्रभावित, राष्ट्रवादीत केला प्रवेश

**● कोपरगाव | वीरभूमी –**

कोपरगाव मतदार संघाचा विकास साधतांना आ. आशुतोष काळे यांनी मतदार संघातील राहाता तालुक्यातील अकरा गावांना देखील कोपरगाव तालुक्यातील गावांप्रमाणे समसमान न्याय देतांना या गावातील मागील अनेक वर्षापासून प्रलंबित असणारे विकासाचे प्रश्न सोडविले आहेत. त्यामुळे रस्ते, पाणी, वीज असे मुलभूत प्रश्न मार्गी लागले आहे. त्यामुळे आजवर न झालेला विकास आ. आशुतोष काळे यांनी करून दाखविल्यामुळे मतदार संघातील राहाता तालुक्यातील वाकडी गावातील भाजप कार्यकर्ते झालेल्या विकास कामांवर प्रभवित होवून त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस



पक्षात प्रवेश केला आहे.

यामध्ये वाकडी (गोटेवाडी) येथील नारायण भालेराव, जालिंदर महाजन, पाराजी महाजन, भीमराव कापसे, संदीप शिंदे, बाळासाहेब सावंत, संजय महाजन, भारत महाजन, गणू शिंदे, मच्छिंद्र महाजन, विलास म्हस्के, बाळासाहेब गायकवाड, रावसाहेब सदाफळ, योगेश माघाडे या भाजपच्या कोल्हे गटाच्या कार्यकर्त्यांनी आ. आशुतोष काळे यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. या सर्व कार्यकर्त्यांचे आ. आशुतोष काळे यांनी स्वागत करून त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

यावेळी अण्णासाहेब कोते, भाऊसाहेब आहिरे आदींसह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते. मागील काही दिवसांपासून भाजपचे अनेक कार्यकर्ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात दाखल होत आहेत. काही दिवसांपूर्वी कोपरगाव शहरात देखील राजकीय भूकंप होवून कोल्हे गटाचे माजी उपनगराध्यक्षासह, नगरसेवक व प्रमुख कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. हे लोन आता मतदार संघातील राहाता तालुक्यातील अकरा गावात पसरले आहे. त्यामुळे वाकडी (गोटेवाडी) च्या भाजपच्या कोल्हे गटाच्या कार्यकर्त्यांनी प्रवेश केला असून यापुढील काळात देखील अनेक कार्यकर्ते कोल्हे गटाचे कार्यकर्ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करणार आहे.

# एसएमबीटी डेंटल कॉलेजमध्ये अँटी रॅगिंग कार्यशाळा

**● संगमनेर | वीरभूमी –**

विद्यार्थी जीवनात ज्ञान प्राप्ती हेच महत्वाचे कर्तव्य असून इतर आवांतर विषयाकडे विद्यार्थ्यांनी दुर्लक्ष करावे. रॅगिंग करून छळ करणे हा गुन्हा असल्याचे प्रतिपादन आदिवासी सेवक प्रा. बाबा खरात यांनी केले आहे.

एसएमबीटी दंत महाविद्यालय येथे अँटी रॅगिंग या महत्त्वपूर्ण विषयाबद्दल कार्यशाळा संपन्न झाली. यावेळी ते बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अशोक पाटील हे होते तर व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. गिरीश नाझीरकर, प्रशासकीय अधिकारी डॉ. सुयोग तूपसाखरे, अँटी रॅगिंग कमिटी सदस्य, पत्रकार गौतम गायकवाड अ‍ॅड. प्रज्ञा लामखडे, पालक प्रतिनिधी डॉ. माहेश्वरी ओझा, डॉ. सुभाष मंडलिक, बाबासाहेब ढगे, प्रा. पंकज जाधव, रमेश दिघे आदी मान्यवर उपस्थित होते.



यावेळी बोलताना प्रा. बाबा खरात म्हणाले की, रॅगिंग करणे ही एक मनोविकृती आहे. आपली भारतीय संस्कृती ही माणसाला जगा आणि जगू द्या अशी आहे. जेव्हा व्यक्ती ही संस्कृतीकडून विकृतीकडे जाते तेव्हा कायद्याची गरज भासते. समाजातील व्यक्तींना योग्य मार्गदर्शन असेल तर समाजात शांतता राहते व त्यांचे आयुष्य सुखकर होते. माणूस हा समाजशील प्राणी असला तरी प्रकृतीला संस्कृतीचे रूप देऊन माणसाने आपली वेगळेपण सिद्ध केले आहे. महाविद्यालयात शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांनी शिक्षणाचा आनंद घ्यावा. रॅगिंग सारख्या कृतीत भाग न घेता करिअरच्या दृष्टीने उपयुक्त उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

यावेळी प्राचार्य डॉ.पाटील म्हणाले की, अँटी रॅगिंग कमिटीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांकडून विकृत स्वरूपाच्या घटना घडू नयेत यासाठी समुपदेशन कार्यक्रम घेतले जातात. एसएमबीटी महाविद्यालयाचा ही हाच हेतू असून अँटी रॅगिंग कमिटीमुळे विद्यार्थ्यांच्या मनातील भीती दूर होण्यास मदत होईल.

# आगडगावच्या काळभैरवनाथांची रविवारी यात्रा

**● नगर | वीरभूमी –**

तालुक्यातील आगडगाव येथील काळ भैरवनाथांची यात्रा रविवारी (दि. २८) साजरी होत आहे. दोन दिवस चालणाऱ्या या उत्सवात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

रविवारी पहाटे महाआरती, सकाळी कावडीने आणलेल्या गंगाजलाने जलाभिषेक, दुपारी महाप्रसाद वाटप, संध्याकाळी काठ्यांची मिरवणूक व सांस्कृतिक कार्यक्रम होतील. कावडीनंतर होणाऱ्या महाआरतीला उद्योजक नरेंद्र फिरोदिया उपस्थित राहतील. दुसऱ्या दिवशी (सोमवारी) कुस्त्यांचा हगामा होईल.

राज्यातील मल्ल त्यामध्ये सहभागी होतील. यात्रेनिमित्त माळीवाडा बसस्थानकापासून विशेष बसची व्यवस्था करण्यात आली आहे. देवस्थानाजवळ विकास कामे सुरू आहेत. त्यामुळे वाहने पार्किंगची व्यवस्था स्वतंत्रपणे करण्यात आली आहे. देवस्थानाजवळ पशुहत्या बंदी आहे. गोड नैवेद्य देवाला दाखवावा, असे आवाहन देवस्थानाच्या वतीने करण्यात आले आहे.

# हौसिंग सोसायटीच्या लाभधारकांची फसवणूक; कंत्राटदारावर फौजदारी कारवाईची मागणी

**● नेवासा | वीरभूमी –**

शेवगाव येथील कंत्राटदाराकडून नेवासा फाटा येथील साईब्रह्मा, साई सिटी हौसिंग सोसायटीच्या लाभधारकांची मोठी फसवणूक करण्यात आली आहे. त्यामुळे संतप्त लाभधारक रहिवाशांनी कंत्राटदारावर रेरा कायद्यानुसार फौजदारी कारवाई करण्याची मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

याबाबतच्या निवेदनात लाभधारकांनी म्हटले की, साई डेव्हलपर्सचे भागीदार असलेले कंत्राटदार विजय देशमुख यांनी मुकिंदपूर येथील गट नंबर ७२/७/क/१ मधील बिगरशेती प्लॉट विकसन करारनामा करून बिगरशेती मिळकतीमधील बांधकामासाठी दिले होते. मात्र, दिलेल्या जाहिरातीनुसार बांधकाम चांगल्या दर्जाचे केले नाही. कंत्राटदाराने प्लॉटधारकांना फसवून व विश्वासघात करुन ठरल्याप्रमाणे बांधकाम पूर्ण केले नाही. उलट प्लॉट धारकांकडून वेगवेगळी कारणे सांगून संपूर्ण रक्कम वेळोवेळी घेतली. तसेच करारनाम्यातील शर्ती व अटी व रेरा कायद्याचा भंग करुन मोठी रक्कम हडप करुन फसवणूक केली.. कंत्राटदाराची बांधकाम पूर्ण करून देण्याची जबाबदारी असतांना त्रुटी व बांधकाम अपूर्ण ठेवले. त्यामुळे रो-हौसिंग सोसायटीमध्ये लाभधारकांना सुविधा मिळत नाहीत. उलट त्यांची व कुटुंबीयाचे आरोग्य व जीवितास धोका होण्याचा संभव आहे.

रो-हौसिंगचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाले असून जिन्याचे काम केले नाही. वॉश बेशिंग बसवले नाही. तसेच सुरक्षेतेच्या दृष्टीने सेप्टी दरवाजे बसविले नाहीत. प्रत्येक प्लॉटधारकांच्या रो-हौसिंगला संरक्षक भिंतीचे काम व दरवाजाचे काम केले नाही. वाहना पार्किंगची व्यवस्था नाही. पिण्याची पाण्याची सोय नाही. हायमॅक्स दिवे आवश्यक ठिकाणी बसविणे गरजेचे होते. तेही बसविले नाहीत. मोकळ्या जागेत पेव्हिग ब्लॉक, सांडपाण्याची व्यवस्था केली नसल्यामुळे काही ठिकाणी घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. परिणामी संपूर्ण परिसरात दुर्गंधी पसरत आहे. त्याने रहिवाशांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

या सर्व बाबींस कंत्राटदार जबाबदार आहे. बांधकाम निकृष्ट झाल्याने पावसात छताला गळती लागते. साई डेव्हलपर्सने या परिसरात दुसरी साईपुष्प सोसायटी, हंडीनिमगांव परिसरत स्थापन केली आहे. त्या अगोदर खोटी जाहीरात करुन साईपुष्प सोसायटीमधील रहिवाशांनी महसूल अधिकारी व आरोग्य अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रारी केल्याचे निवेदनात नमूद केले आहे. कंत्राटदार देशमुख यांनी जाहीरातीद्वारे आमिष दाखवून मोठी आर्थिक फसवणूक केली आहे. या कंत्राटदाराविरुद्ध नेवासा न्यायालयात फौजदारी कारवाई प्रलंबित आहे, याकडेही लक्ष वेधण्यात आले आहे.

# अपयशातून यशाचा मार्ग तयार करा : आ. आशुतोष काळे

## ब्राम्हणगाव येथे 'आमदार चषक २०२४' भव्य टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा संपन्न

**● कोपरगाव | वीरभूमी –**

स्पर्धा कोणतीही असो यश अपयश हा स्पर्धेचा अविभाज्य भाग आहे. त्यामुळे प्रत्येक स्पर्धेत आपल्याला यश मिळेलच असे नाही व सतत अपयश मिळेल असेही नाही. त्यामुळे मिळणाऱ्या यशाने हुरळून जावू नये व येणाऱ्या अपयशातून निराश देखील होवू नये. मिळालेल्या अपयशात झालेल्या चुका सुधारून अपयशातून यशाचा मार्ग तयार करा, असा मौलिक सल्ला आ. आशुतोष काळे यांनी दिला.

श्रीराम नवमीनिमित्त ब्राम्हणगाव येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे युवक कार्यकर्ते राहुल सोनवणे यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या 'आमदार चषक २०२४' भव्य टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्याची नाणेफेक आ.आशुतोष काळे यांच्या हस्ते करण्यात येवून विजेत्या संघाना त्यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले याप्रसंगी त्यांनी खेळाडूंशी संवाद साधत त्यांना शुभेच्छा दिल्या.

ते म्हणाले की, सध्याच्या धकाधकीच्या व धावपळीच्या जीवनात उत्तम आरोग्य अत्यंत महत्वाचे असून निरोगी आरोग्यासाठी नियमित व्यायाम आणि योग्य आहार गरजेचा आहे. त्यामुळे वयाचे बंधन न बाळगता सर्वांनीच स्पर्धात्मक क्रिकेट स्पर्धेत सहभाग घ्यावा. खेळाडूंच्या क्रीडा गुणांना वाव मिळावेत यासाठी त्यांना आवश्यक सोयी सुविधा निर्माण करून देण्यासाठी माझे प्रयत्न सुरु आहेत. राष्ट्रीय खेळाडू निर्माण होण्यासाठी अशा स्पर्धा उत्तम व्यासपीठ असून त्या माध्यमातून गुणवान खेळाडू घडले जावून त्यांनी आपल्या कोपरगावचा नावलौकिक राज्यासह देशात वाढवावा अशी अपेक्षा व्यक्त केली.

या स्पर्धेत एकूण ३२ संघ सहभागी झाले होते. स्पर्धेचा अंतिम सामना जगदंबा मैदानावर डीसीसी (दत्त नगर क्रिकेट क्लब) श्रीरामपूर व ब्राम्हणगाव क्रिकेट क्लब या दोन संघांत पार पडला संगमनेर क्रिकेट क्लब या संघाने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करतांना ५ षटकात ४५ धावा केल्या. विजयासाठी आवश्यक असलेले ४६ धावांचे लक्ष्य ब्राम्हणगाव क्रिकेट संघाने ९ गडी राखून आरामात पार करीत प्रथम क्रमाकाचे ४४ हजार ४४४ रुपयांचे रोख बक्षीस पटकावत आमदार चषकावर आपले नाव कोरले तर डीसीसी (दत्त नगर क्रिकेट क्लब) श्रीरामपूर या संघाला दुसऱ्या क्रमांकाच्या ३३ हजार ३३३ रुपयांच्या बक्षीसावर समाधान



मानावे लागले. तिसरे २२ हजार २२२ रुपयांचे तिसरे बक्षीस संगमनेर क्रिकेट क्लबने तर ११ हजार १११ रुपयांच्या चौथ्या बक्षिसाचा मानकरी कोपरगावचा संघ ठरला.

यावेळी कर्मवीर शंकरराव काळे कारखान्याचे संचालक श्रावण आसने, राष्ट्रवादीचे जिल्हा सरचिटणीस विठ्ठलराव आसने, तुकाराम उळेकर, गणेश आसने, रवींद्र पिंपरकर, बाबासाहेब जगताप, पांडुरंग सोनवणे, तुकाराम सोनवणे, नानासाहेब सोनवणे, एकनाथ शिंगाडे, शरद उळेकर, आनंद भुजाडे, अशोक बनकर, गणेश आहेर, गणेश बर्डे, रविंद्र शिंदे, सोमनाथ फापाळे, गणेश फापाळे, जावेद शेख, प्रमोद तनपुरे आदींसह सहभागी संघाचे खेळाडू व क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.